**दिनांक ५ जून, २०१०**
**जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्याबाबत-**

**महाराष्ट्र शासन**
पर्यावरण विभाग
शासन निर्णय क्र.इएनव्ही-२००९/प्र.क्र.१०१/तां.क.३
१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा रोड, मुंबई-४०००३२.
दिनांक :१५ मार्च, २०१०

**प्रस्तावना:-**

पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हे जनसमुदायाच्या सक्रीय सहभागाशिवाय होणे शक्य नाही. यासाठी पर्यावरण विषयक बाबींची जाणीव जनमानसांत निर्माण होणे आवश्यक आहे. पर्यावरण विषयक जनजागृती करण्याच्या उद्देशाने राज्य स्तरावर समाजातील विविध घटकांचा समावेश असलेला कार्यक्रम आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन निर्णय -**

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृती करण्यासाठी दिनांक ५ जून, २०१० या जागतिक पर्यावरण दिनानिमित्त राज्य स्तरावर विविध स्पर्धांचे आयोजन करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर स्पर्धा विविध गटांसाठी आयोजित होणार असून, त्यात शालेय व महाविद्यालय प्रकल्प, छायाचित्र, घोषवाक्य व बालसाहित्य अशी वर्गवारी असणार आहे. सदर स्पर्धेचे आयोजन पर्यावरण विभाग हे सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, (CEE), पुणे यांचेमार्फत करण्यास या शासन निर्णयाद्वारे करण्यास मान्यता देण्यात येत असून, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांनी या कामासाठी प्रस्तावित केलेल्या खर्चाच्या बाबीं पुढीलप्रमाणे :

| Description | Amount in Rs. |
|---|---|
| Publicity (Print) material creation | 10,000 |
| Evaluation of entries | 30,000 |
| Poster (Marathi and English) Printing, Distribution 1500 copies | 75,000 |
| Travel and acco, food etc. for winners 5 categories – 3 winner per category total 20 winners Rs. 5000*20 | 1,00,000 |
| Banner 4 (1500*4)+ back drop (4000) | 10,000 |
| Press/delegate kit (bag + note + booklet + stationery) 300*100 | 30,000 |
| Exhibition of photos, posters made based on other entries (10 in each of 8 categories)= 80 posters 2 * 3 size @ Rs. 700 | 56,000 |
| Exhibition system / panels hire | 20,000 |
| Webpage design and management | 10,000 |
| Design, content development and coordination costs | 2,50,000 |
| Book / souvenir produced from winning entries (4 colour * 500 copies) | 1,50,000 |
| Article series through media tie-up | 75,000 |
| Prize money (see detail below)* | 82,000 |
| Communication, postage, photocopy | 91,800 |
| Administration @ 10% | 91,800 |
| **Total** | **10,09,800** |

३. सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांनी प्रस्तावित केलेल्या एकूण रु.१०,०९,८००/- एवढया खर्चास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. खर्चाचा तपशिल, त्यातील बदल तसेच स्पर्धेचा सादर तपशिल व त्यात प्रसंगत्वे करावयाचे बदल याबाबतचा अधिकार पर्यावरण विभागाकडे असतील.

४. स्पर्धेचे आयोजन व आयोजनाबाबत सर्व निर्णय हे सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन,पुणे पर्यावरण विभागाच्या पूर्व सम्मतीने करेल. स्पर्धेच्या आयोजनासाठी सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, पुणे यांना खर्चाचा पहिला हप्ता म्हणजेच **रु. ५.०० लक्ष (रु. पांच लक्ष फक्त)** एवढा निधी वितरीत करण्यास या शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्त रकमेचा धनादेश 'Centre for Environment Education',Pune यांच्या नावे काढण्यात यावा.

५. यासाठी होणारा खर्च मागणी क्र.यू-४-३४३५-परिस्थितीकी व पर्यावरण,०४,प्रदुषण प्रतिबंध व नियंत्रण १०३,वायु व जल प्रदुषण प्रतिबंध, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना,(०२)(१३) पर्यावरण जनजागृती, शिक्षण, हवामान बदल कृति आराखडा (३४३५ १३०५) ३१, सहाय्यक अनुदाने या लेखाशिर्षाखाली मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. सन २००९-१० या आर्थिक वर्षी उपरोक्त कार्यक्रमासाठी पुरवणी मागणीद्वारे एकूण रु.५०.००लक्ष तरतूद उपलब्ध आहे.

६. सदर रक्कम रु. ५.०० लक्ष अधिदान व लेखाधिकारी यांच्यामार्फत कोषगारातून काढून **"Centre for Environment Education, Pune"** यांना अदा करण्यासाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून श्री. दे.के. मानकर, अवरसचिव, पर्यावरण विभाग व नियंत्रण अधिकारी म्हणून श्री. श्या. ना. धकाते, उपसचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय यांना घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **"Centre for Environment Education"Pune** यांना रु.५,००,०००/- (अक्षरी रुपये पांच लक्ष फक्त) अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई येथून स्वतंत्र धनादेशाद्वारे वितरीत करण्याची कार्यवाही करावी.

७. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५१/१०/अर्थ-७ दिनांक ४.३.२०१० अन्वये दिलेल्या अनुमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००३१८१२२५१३००१ आहे.

महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(दे. के. मानकर)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
मा. राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय. मुंबई,

मुख्य सचिव यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
संचालक, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन, सेंट्रल रिजनल सेल, पुणे,
सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, सायन, मुंबई,
सचिव (पर्यावरण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
महालेखापल (लेखा व अनुज्ञयेतना/लेखापरिक्षा) महा-१ व महा-२, मुंबई/नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
वित्त विभाग (अर्थ-५/व्यय-१६), मंत्रालय, मुंबई,
पर्यावरण विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती.